**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**
सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,
**सोलापूर** - ४१३ २५५ (महाराष्ट्र राज्य)
website: http://su.digitaluniversity.ac
Fax : 91-0217-2744777

**SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR**
Solapur Pune National Highway, Kegaon,
**Solapur** - 413 255 (Maharashtra)
EPABX: 0217-2744763, 66,67 Ext-122
Email : bcudsu@gmail.com

**जा.क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/** 8032 **दिनांक:** 29 JUL 2015

**प्रति,**
**मा.प्राचार्य/संचालक/सचिव,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये,**

**विषय:-** **महाविद्यालये / शैक्षणिक संस्थांमध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या नियुक्तीबाबत.**

**संदर्भ:-** शासनाचे जा.क्र. अपील २०१५/प्र.क्र.४१/आस्था २, दि.१०/०७/२०१५ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन, उक्त संदर्भिय शासन पत्र आपल्या माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित करण्यात येत असून सदर पत्राचे अवलोकन व्हावे व सदर पत्रान्वये दिलेल्या सूचनेनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

सदर पत्र विद्यापीठाच्या http://su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circulars/Notice या मथळ्याखाली उपलब्ध आहे.

आपला विश्वासू,

**[संचालक]**
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

**प्रत:**

१. **मा.उप सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई. ४०० ०३२**
२. **मा.शिक्षण संचालक (उ.शि.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे. ४११ ००१**
३. **मा.विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर विभाग, सोलापूर.४१३ ००१**



sudhir

Solapur University BCUD
Inward No :- 158
Jr. Clerk
20 JUL 2015
DIRECTOR
Asst. Registrar Dy. Registrar B.C.U.D.
LMT

महाराष्ट्र शासन

क्रमांक : अपील २०१५/प्र.क्र.४१/आस्था २
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १० जुलै, २०१५.

प्रति,

१. संचालक (उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण/व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण/कला / ग्रंथालय),
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.

विषय :- महाविद्यालये / शैक्षणिक संस्थांमध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या नियुक्तीबाबत.

संदर्भ :- १. शासन पत्र क्र.केंमाअ २००७/प्र.क्र.३१/आस्था २, दि.९.२.२००७.
२. शासन पत्र क्र.केंमाअ २००८/प्र.क्र.१८/आस्था २, दि.२९.२.२००८.

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भाधीन पत्रांचे कृपया अवलोकन करावे.

२. दिनांक १६.५.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याकडे उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या झालेल्या आढावा बैठकीमध्ये मा.राज्य माहिती आयुक्त यांनी असे स्पष्ट केले आहे की, त्यांच्याकडे द्वितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या असे निदर्शनास आणले आहे की, शासनाच्या उपरोक्त सूचनांमुळे संभ्रम निर्माण होत असून कोणत्या बाबीकरिता महाविद्यालये, शैक्षणिक संस्थेतील अधिकारी (उदा. प्राचार्य, संस्थेचे सचिव, संस्थेचे चेअरमन) जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी असतील तर कोणत्या बाबींकरिता संबंधित उपसंचालक / सहसंचालक, प्रादेशिक विभाग हे प्रथम अपिलीय प्राधिकारी असतील, हे स्पष्ट होत नसल्याने माहिती अधिकारांतर्गत प्राप्त होणारे अर्ज निकाली निघण्यास विलंब होत आहे. उपसंचालक / सहसंचालक, प्रादेशिक विभाग हे प्रथम अपिलीय प्राधिकारी असल्याने त्यांच्याकडे अपिलांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. विचारली गेलेली माहिती ही महाविद्यालये / शैक्षणिक संस्था यांच्या स्तरावरील असल्यास माहितीच्या अधिकारांतर्गत प्राप्त होणारा अर्ज महाविद्यालये / शैक्षणिक संस्था यांच्या स्तरावर अंतिम निकाली निघणे आवश्यक आहे. यासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने स्पष्ट सूचना निर्गमित करण्याचे निदेश मा.राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दिलेले आहेत. त्यानुसार पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत –

अ) महाविद्यालये / शैक्षणिक संस्था यांच्या कार्यालयातील माहितीकरिता महाविद्यालये / शैक्षणिक संस्थांमधील अधिकारी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी

Estt / BCUD
To communicate Colleges.
13/7

राहतील. (उदा. प्रबंधक / अधिक्षक हे जन माहिती अधिकारी असतील तर प्राचार्य प्रथम अपिलीय प्राधिकारी राहतील)

आ) उपसंचालक / सहसंचालक, प्रादेशिक विभाग यांच्या कार्यालयातील माहितीकरिता त्या त्या कार्यालयातील अधिकारी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी राहतील.

इ) माहितीच्या अधिकारांतर्गत प्राप्त अर्जांचा तात्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने सर्व सार्वजनिक प्राधिकरणांतर्गत कामाच्या विभाजनानुसार पुरेसे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्ती करावी व यासंदर्भातील यादी प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने प्रसिध्द करावी.

ई) माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम ४(१)(अ) मध्ये नमूद केल्यानुसार सर्व अभिलेख तालिकाबध्द व सूचीबध्द करण्यात यावेत.

उ) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४(१)(ब) नुसार कार्यवाही करुन माहिती अद्ययावत करण्यात यावी.

३. आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये / शैक्षणिक संस्था यांना त्यानुसार सूचना देव्यात.

४. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास २० दिवसांच्या कालावधीत पाठवावा, ही विनंती.

(पा. म. ताकटे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

सर्व सह सचिव / उप सचिव/ अवर सचिव / कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

Solapur University, Solapur
Inward No:- 252
Date:- 17 JUL 2015